


## इंधन टंचाई : वाढते संकट आणि उपाययोजना



आजच्या आधुनिक युगात इंधन हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक वायू, कोळसा यांसारख्या इंधन स्रोतांवर उद्योग, वाहतूक, शेती आणि दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. मात्र वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरेकी वापर यामुळे जगभरात इंधन टंचाईचे संकट गंभीर होत चालले आहे. भारतासारख्या विकसनशील देशालाही या समस्येचा मोठा फटका बसत आहे.

इंधन टंचाई म्हणजे इंधनाची मागणी आणि उपलब्धता यामध्ये निर्माण होणारी तफावत होय. जेव्हा इंधनाचा पुरवठा कमी होतो किंवा त्याच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढतात, तेव्हा सर्वसामान्य नागरिकांसह उद्योगधंद्यांवर त्याचा विपरीत परिणाम होतो. अलीकडच्या काळात आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ-उतार, युद्धजन्य परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती आणि राजकीय अस्थिरता यांमुळे इंधन दरांमध्ये सतत वाढ होत आहे.

इंधन टंचाईमागील प्रमुख कारणांमध्ये वाढते वाहनांचे प्रमाण हे महत्त्वाचे कारण आहे. आज प्रत्येक कुटुंबात एकापेक्षा अधिक वाहने दिसून येतात. सार्वजनिक वाहतुकीपेक्षा खासगी वाहनांना अधिक प्राधान्य दिले जात असल्याने पेट्रोल-डिझेलचा वापर झपाट्याने वाढत आहे. याशिवाय औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर जीवाश्म इंधनाचा वापर होतो. जंगलतोड, प्रदूषण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरेक यामुळे पर्यावरणीय समतोलही बिघडत आहे.

इंधन टंचाईचा थेट परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो. पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्या की वाहतूक खर्च वाढतो आणि परिणामी जीवनावश्यक वस्तू महाग होतात. शेती क्षेत्रातही डिझेलवर चालणाऱ्या पंपांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढतो. उद्योगधंद्यांचे उत्पादन खर्च वाढल्यामुळे महागाई वाढते आणि सामान्य नागरिकांचे आर्थिक नियोजन कोलमडते.

पर्यावरणाच्या दृष्टीनेही इंधन टंचाई गंभीर विषय आहे. जीवाश्म इंधनाच्या ज्वलनामुळे कार्बन डायऑक्साइडसारखे घातक वायू वातावरणात सोडले जातात. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग, हवामान बदल आणि वायुप्रदूषणाच्या समस्या अधिक तीव्र होत आहेत. म्हणूनच पर्यायी ऊर्जा स्रोतांचा वापर ही काळाची गरज बनली आहे.

या समस्येवर उपाय म्हणून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जैवइंधन आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. सरकारने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करणे, इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणे आणि ऊर्जा बचतीबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. नागरिकांनीही इंधनाचा वापर मर्यादित ठेवणे, कारपूलिंग करणे आणि अनावश्यक वाहन वापर टाळणे आवश्यक आहे.

इंधन टंचाई ही केवळ आर्थिक समस्या नसून सामाजिक आणि पर्यावरणीय संकटदेखील आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी ऊर्जा स्रोत टिकवून ठेवायचे असतील, तर आजपासूनच शाश्वत ऊर्जा वापराची सवय लावणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शासन आणि नागरिक यांनी संयुक्तपणे प्रयत्न केल्यास या संकटावर निश्चितच मात करता येईल.

# देशासहित राज्यावर महागाईचे दुहेरी संकट..

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी शेतीसंबंधी दोन महत्त्वाच्या बैठका घेतल्या. त्यातही पहिली राज्यस्तरीय खरीप हंगाम आढावा बैठक होती, तर दुसरी बैठक राज्यस्तरीय बँकर्स समितींची होती. या दोन्ही बैठकीच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार शेतीला बसणारा अल निनोचा फटका, कृषी पीक कर्जवाटप आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणींवर भाष्य केले. सध्या देश मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे.




आखातातील संघर्षामुळे देश इंधन, खत टंचाईच्या काठावर उभा आहे. भरमसाठ पैसे खर्च करून सरकारला देशवासीयांची इंधन गरज भागवावी लागत असल्याने पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना काटकसरीचा सल्ला दिलेला आहे. देशात विविध पातळीवर काटकसर सुरू असताना पेट्रोल-डिझेल आणि गॅसचे दर आतापर्यंत दोनदा वाढलेत. यामुळे सर्वसामान्यांच्या दारात महागाई आ वासून उभी आहे. त्यातच अल निनोच्या प्रभावामुळे देशात सरासरीच्या ९२ टक्केच पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने चालू वर्ष भारतासाठी आव्हानात्मक जाणार असल्याचे चित्र आहे. एका अर्थाने भारतीय अर्थव्यवस्थेसमोर महागाईचे दुहेरी संकट उभे ठाकले आहे.

अलनिनो आणि ला निना या जागतिक हवामानविषयक संकल्पना आहेत, ज्याचा थेट परिणाम जगभरातील आणि विशेषतः भारताच्या हवामानावर अर्थात मान्सूनमुळे तयार होणाऱ्या पावसावर होतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, प्रशांत महासागरातील समुद्राचे पाणी नेहमीपेक्षा जास्त गरम होण्याच्या प्रक्रियेला अल निनो आणि हेच पाणी नेहमीपेक्षा जास्त थंड होण्याच्या प्रक्रियेला ला निना म्हणतात. ला निना देशासाठी फायदेशीर मानला जातो, कारण यामुळे भारतात सरासरीपेक्षा जास्त आणि चांगला पाऊस पडतो. परंतु, अल निनो आपल्यासोबत टेन्शनचे वातावरण घेऊन येतो. अल निनोमुळे तापमान सरासरीपेक्षा अधिक वाढून उन्हाचा कडाका जाणवतो. ज्याची दाहकता सध्या आपण सर्वच जण अनुभवत आहोत. विदर्भ मराठवाड्यात पारा ४७ अंशांवर जाऊन पोहोचला आहे. देशातील अनेक भागांत तापमानाने उच्चांक गाठला आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांसह सर्वसामान्य पावसाची




चातकासारखी वाट बघत असताना अल निनो पाऊस टंचा टंचाईचा कटू निरोप घेऊन आला आहे. अल निनोचा थेट संबंध मान्सूनच्या पावसाशी असल्यामुळे भारतीय शेतीवर त्याचे अत्यंत गंभीर आणि दूरगामी परिणाम होण्याची चिन्हे आहेत. उष्णतेच्या लाटांमुळे कृषी उत्पादनाला फटका बसू शकतो. भारत हा शेतीप्रधान देश असल्याने अल निनोमुळे शेतीचे अर्थकारण मोठ्या प्रमाणावर बिघडू शकते. महाराष्ट्राच्या बाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली माहिती आगामी धोक्याची जाणीव करून देणारी आहे. राज्यात यंदाच्या खरीप हंगामावर अल निनोचे मोठे सावट असून त्यामळे राज्यात सरासरी ८८ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज आहे. त्यातही पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांवर अवर्षणाचे संकट घोंगावत आहे. मध्य पूर्वेतील युद्धामुळे रासायनिक खतांच्या तुटवड्याचा शेतकऱ्यांना फटका बसू शकतो, अशी भीती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

भारतातील तांदूळ, कापूस, सोयाबीन, मका, तूर आणि भुईमूग आदी खरीपाची पिके पूर्णपणे मान्सूनच्या पावसावर अवलंबून असतात. पाऊस लांबल्यास पेरण्या खोळंबण्याची किंवा पाऊस लवकर गायब झाल्यास उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. आधीच उन्हाच्या तीव्रतेमुळे राज्याच्या ग्रामीण भागात पाणीटंचाईचे गंभीर संकट उद्भवले आहे. आजच्या घडीला राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १ हजार ६५२ तहानलेल्या वाड्यांना ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. राज्यात उन्हाचा कडाका कायम राहिल्यास येत्या काही दिवसात पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या गावांची आणि वाड्यांची संख्या आणखी वाढू शकते. त्यातच पाऊस कमी झाल्यास नद्या, विहिरी, बोअरवेल आणि धरणांमधील पाणीसाठा लवकर आटून खरीपासोबतच रब्बी पिकांनाही त्याचा फटका बसू शकतो. शेती उत्पादन कमी झाल्यास बाजारात अन्नधान्य, भाज्या, डाळींची आवक कमी होईल. अन्नधान्याच्या किमती वाढल्यास महागाई आणखी भडकू शकते. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामात पिकांचे नियोजन आणि पाण्याचे व्यवस्थापन सरकारला करावे लागणार आहे. त्यात नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवारअंतर्गत जलसंधारणाची कामे वेळेत पूर्ण करणे, शेतकऱ्यांना वेळेवर मुबलक प्रमाणात बी-बियाणे, खते उपलब्ध करून देणे आवश्यक ठरेल. मुख्यमंत्र्यांनी बँकर्स समितीच्या बैठकीत राष्ट्रीयीकृत बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यात गांभीर्य दाखवत नाहीत, अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली. त्यात मोठ्या प्रमाणावर तथ्यही आहे. त्यामुळे ८० टक्क्यांच्या वर पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याची सूचना करताना शेतकऱ्यांकडे सिबिलची मागणी न करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या बँकांना दिले ते बरेच झाले.

मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनुसार ३० जूनआधी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाल्यास मोठा दिलासा मिळेल. शेतकरी हा केवळ आपला अन्नदाता नाही तर अर्थचक्र सुरळीत ठेवणारा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणाही आहे. इंधन दरवाढ मालवाहतूक महाग होण्यास कारणीभूत ठरेल. याचा थेट परिणाम म्हणून दूध, भाजीपाला, फळे आणि किराणा माल यांसारख्या दैनंदिन गोष्टींचे भाव कडाडतील. परिणामी देशात महागाई वाढणे अपरिहार्यच आहे. मात्र, देशातील शेतकऱ्यांनी पाण्याच्या योग्य व्यवस्थापनाच्या आधारे पुरेसे पिकपाणी घेतल्यास या भडकणाऱ्या महागाईला वेसण घालता येईल. म्हणूनच देशावरील दुहेरी संकट निवारण्याची मोठी जबाबदारी आता शेतकऱ्यांवर असेल.

# जागतिक हवामान खात्याचे भाकीत खरे ठरत आहे

यावर्षीचा उन्हाळा हा आजवरचा सर्वात कडक उन्हाळा समजला जात आहे. यावर्षी सर्वच शहरांचे तापमान ४२ अंशाच्या पुढे गेले आहे काही शहरांचे तापमान तर ४५ ते ४७ अंशाच्या घरात आहे. वाढत्या तापमानाने देशातील जनता हैराण झाली आहे. उष्णता वाढल्याने उष्माघात होऊन अनेकांचे प्राणही गेले आहेत. केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात हीच परिस्थिती आहे याला कारण आहे ते म्हणजे ग्लोबल वॉमिंग. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान मर्यादित पातळीपेक्षा जास्त वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंग ही समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची ही समस्या दरवर्षी वाढत जाईल असे भाकीत जागतिक हवामान खात्याच्या संशोधकांनी काही वर्षापूर्वी व्यक्त केले होते ते खरे होताना दिसत आहे. जागतिक हवामान खाते ( डब्लूएमओ ) ही संयुक्त राष्ट्र संघटनेची एक संघटना असून ती जागतिक हवामानावर संशोधन करते. या संस्थेच्या संशोधकांनी १८५० ते १९०० या ५० वर्षाच्या कालखंडातील तापमामाच्या सरासरीचा आणि त्यानंतरच्या कालखंडाच्या सरासरी तापमानाचा तुलनात्मक अभ्यास करून हे भाकीत वर्तवले होते. १८५० ते १९०० या कालखंडात औद्योगिकीकरणास सुरवात झाली नव्हती त्यामुळे कोळसा, गॅस आणि तेल यांच्या वापरास सुरवात झाली नव्हती. मात्र त्यानंतरच्या कालखंडात औद्योगिकीकरणास सुरवात झाली आणि जेंव्हा पासून औद्योगिकीकरणास सुरवात झाली तेंव्हापासून पृथ्वीच्या तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाल्याचा निष्कर्ष या संस्थेच्या संशोधकांनी काढला होता. औद्योगिकरणास सुरवात झाल्यापासून म्हणजेच विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून पृथ्वीचे तापमान वाढण्यास सुरवात झाली असून यापुढे जागतिक तापमान अधिक वेगाने वाढणार असल्याचा निष्कर्ष या संशोधकांनी काढला होता. या निष्कर्षानुसार २०२७ पर्यंत म्हणजे पृथ्वीचे तापमान दीड डिग्रीने वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. ही शक्यता ६६ टक्के संशोधकांनी वर्तवली होती. संशोधकांनी वर्तवलेले हे भाकीत खरे होताना दिसत आहे. यावर्षी मागील वर्षापेक्षाही अधिक आहे. जागतिक हवामान खात्याने वर्तवलेले हे भाकीत खरे ठरत आहे. पृथ्वीचे तापमान वाढत असल्याचे मोठे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत जाणार असल्याने युरोप, अमेरिकासह आशिया खंडात उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादळांची तीव्रता वाढेल. वनव्यांचे प्रमाण वाढेल. ज्या भागात पावसाची गरज आहे त्या भागात पाऊस न पडता अन्य भागात पाऊस पडेल. पावसाचे प्रमाण कमी होईल. अतिउष्णतेमुळे हिमनद्या वितळतील. त्यामुळे समुद्राच्या पातळीत वाढ होईल परिणामी पूर येतील. वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे जंगल प्रजातींवर परिणाम होईल. ग्लोबल वॉर्मिंगमुळे जंगलांना आगी लागतील या आगीत अनेक पशुपक्षी व प्राणी मरण पावतील एकूणच ग्लोबल वॉर्मिंगचा फटका केवळ मानवजातीलाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीलाच बसेल. अर्थात याला आपणच म्हणजे मानवच जबाबदार आहे. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभी केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन वाढवले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. अर्थात अजूनही वेळ गेलेली नाही. अजूनही आपण ग्लोबल वॉर्मिंगला थोपवू शकतो. ग्लोबल वॉर्मिंग कमी करण्याचा महत्वाचा मार्ग म्हणजे ग्रीनहऊस वायूंचे उत्पादन कमी करणे. जीवष्म इंधनाऐवजी इतर इंधन स्रोत वापरणे. झाडे लावून ती जगवली पाहीजेत. सर्वात महत्वाचे म्हणजे निसर्गात मानवाने केलेला हस्तक्षेप थांबवला पाहिजे. विकासाच्या नावाखाली होणारा पर्यावरणाचा ऱ्हास रोखला पाहिजे या आणि अशाप्रकारच्या उपाययोजना करून आपण तापमानवाढ नियंत्रणात आणू शकतो. ग्लोबल वॉर्मिंग रोखण्याची जबाबदारी मानवाची आहे. ही समस्या केवळ एका देशाची किंवा एक प्रदेशाची नसून ती जागतिक समस्या आहे म्हणून ग्लोबल वॉर्मिंग रोखण्यासाठी जागतिक समुदायाने देखील कठोर पावले उचलणे गरजेचे आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## गस्त

इंधन भरण्या साठी
ये पोलिस बंदोबस्त
महत्व कामे सोडूनि
पंपावर चालते गस्त

संवेदनशील प्रभाग
हो परिसर वादग्रस्त
भडका उडे कधीही
नागरिक अति त्रस्त

अल्प टंचाई असह्य
मोडून टाकते शिस्त
भरतो आपल टाकी
वागणे माझे बशिस्त

कॅन भरभरून इंधन
घरात ठेवले मदमस्त
ज्वलनशील माणूसा
करा शांतता उध्वस्त

पेटवून देई महागाई
का जीव होई स्वस्त
जरासा भाव वाढता
किती कसे आक्रस्त

शिकवू नंतर जगांस
स्वतास करी दुरूस्त
तुडवडा मानवनिर्मी
रे जबाबदार समस्ते

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# शिक्षण संस्थातील पेपर फुटीला शिक्षण क्षेत्रातील सारेच घटक जबाबदार

नुकताच नीट परीक्षेचा पेपर अगोदरच फुटला. मुख्य म्हणजे याची व्याप्ती महाराष्ट्र राज्यापासून ते राजस्थान, गुजरात पर्यंत पोहचलीआहे. आत्तापर्यंत सुमारे पाच राज्यात हे लोण पसरले आहे. आत्तापर्यंत सीबीआयने तपास वेगाने सुरु केला असून त्याची व्याप्ती मोठी आहे. सध्या खाजगी शिकवणी वर्गाचे पेव फुटले आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थी महाविदलयात जात नाहीत.

त्या ऐवजी ते शिकवणीला जातात. साहजिकच महाविद्यालये नावालाच आहेत. पेपर सेट करणाऱ्या लोकांची सुद्धा भूमिका महत्वाची आहे. त्यांनीच पैशाच्या अमिषाच्या हेतूने व शिकवणी क्लास च्या मदतीने पेपर फोडण्याचे काम केले. यात क्लास चालकांची सहकार्याची भूमिका व पैसे कमावण्याचा धंदा सुरु केला. एक क्लास चालकाने आपल्या मुलाला पेपर फोडून कारवाई केली. हे त्यांने केवळ मुलाला वैद्यकीय महाविद्यालय काढण्याच्या हेतूने केले असे समोर येत आहे.

पेपर सेट करणारे पुण्यातील काही शिक्षकांनी यात हातभार लावून पेपर फोडीस सहकार्य केले. हे पेपर फुटीचे प्रकरण इतुक्या वेगाने पुढे गेले कि यात किती लोक सामील आहेत हे समजण्यास कित्येक दिवसांचा वेळ जाईल. या पेपर फुटीमुळे अभ्यासू विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. पैशाचा अनाठायी अपव्यय होत आहे. इतर काही प्रवेश सुद्धा उशिरा होणार आहेत सुमारे २२ लाख विद्यार्थी या परीक्षेला बसले होते सरकारने पेपर व्यवस्था अतिशय कडक करावयास हवी. पेपर सेट करणार्यांना पेपर फोडल्यास अतिशय कडक शिक्षेची तरतूद करणे आवश्यक आहे.

पेपर सेट केल्यानंतर त्यांना परीक्षेपर्यंत बाहेर संपर्क करण्यास मनाई करावी . या शिवाय शिक्षण तज्ज्ञांनी जे उपाय सुचविले आहेत ते सुद्धा अमलात आणावेत.आता या पेपर फुटीला जे जबाबदार असतील त्यांना कठोर शिक्षा करावी. देशातील केंद्र सरकारमधील शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा.

**- शांताराम वाघ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## डिझेल टंचाईमुळे बोरी परिसरातील शेतकरी चिंतेत, जगायचं कसं?' असा सवाल?



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२३, बोरी (परभणी) :** जगभर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता इंधन पुरवठ्यावर दिसून येत असून पेट्रोल तसेच डिझेल टंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बोरी परिसरात ही डिझेलचा तुटवडा जाणवत असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. डिझेल मिळवण्यासाठी पेट्रोल पंपांवर नागरिक व शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कडक उन्हात तासन्तास प्रतीक्षा करूनही अनेकांना डिझेल मिळत नसल्याने संताप आणि नाराजी व्यक्त होत आहे.

शेती कामांसाठी ट्रॅक्टर, पंप तसेच इतर कृषी यंत्रांसाठी डिझेल अत्यावश्यक असते. मात्र डिझेल उपलब्धतेच्या समस्येमुळे शेतीची अनेक कामे रखडल्याचे चित्र दिसून येत आहे. पेरणीपूर्व मशागत तसेच इतर शेती कामांवर त्याचा परिणाम होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे.

शेती करायची कशी आणि जगायचं कसं? असा सवाल आता शेतकरी उपस्थित करत आहेत. डिझेल टंचाईमुळे शेतीचे नियोजन कोलमडत असल्याने शेतकरी आर्थिक संकटाच्या छायेत आले आहेत. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन डिझेल पुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## गागोदे बु. येथे २७ मे रोजी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२३, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील गागोदे बु. येथे बुधवार, दि. २७ मे २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट, रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या शिबिरामध्ये गर्भधारणा व प्रसूती सेवा, स्त्रीरोग उपचार, वंध्यत्व उपचार, मधुमेह, हृदयरोग, थायरॉईड, दमा, संधिवात, मूत्रविकार तसेच इतर विविध आजारांवर मोफत तपासणी व सल्ला दिला जाणार आहे. तसेच मोफत ईसीजी, रक्तदाब तपासणी, रक्त तपासणी व औषधांचे वितरण करण्यात येणार आहे. शिबिरात डॉ.उमेश साने (स्त्रीरोग तज्ज्ञ) यांच्यासह विविध तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार असून महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अंतर्गत पात्र रुग्णांना मोफत उपचार व शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हे शिबिर गागोदे बु. येथील आचार्य विनोबा भावे जन्मगाव ग्रामस्थ मंडळ येथे आयोजित करण्यात आले असून परिसरातील नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## परभणी-जिंतूर रोडवरील धर्मापुरीजवळ भीषण अपघात; भोगाव देवी येथील युवकाचा मृत्यू



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२३, जिंतूर (परभणी) :** परभणी-जिंतूर मार्गावरील धर्मपुरीजवळ दिनांक २२ मे २०२६ रोजी दुपारच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात भोजगाव देवी येथील एका युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शेख खुजू शेख जुबेर (वय ३०, रा.भोजगाव देवी, ता.जिंतूर) हे आपल्या दुचाकीने परभणीकडून जिंतूरकडे येत होते. धर्मपुरीजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने त्यांना उपचारासाठी परभणी जिल्हा रुग्णालयात दाखल केले.

मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. मृत शेख खुजू हे रोजंदारीवर काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन अपत्ये तसेच आई-वडील असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या अचानक निधनामुळे भोजगाव देवी परिसरात शोककळा पसरली आहे.या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## बोरी येथे वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी; विजपुरवठा खंडित



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२३ बोरी (परभणी) :** शनिवार, दिनांक २३ मे २०२६ रोजी बोरी परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली.

अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी घरांवरील पत्रे उडून गेल्याच्या घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच अनेक भागांमध्ये शेतातील विद्युत पोल कोसळल्यामुळे वीजपुरवठ्यावर परिणाम झाला असून बोरी शहरातील बत्ती गुल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. वादळी वाऱ्यामुळे नागरिकांची काही काळ धावपळ उडाली.

# माणुसकीचा 'डिजिटल' चमत्कार...

## २१ मिनिटांत संपला ५ महिन्यांचा वनवास; नागपूरचे शरद देशमुख सुखरूप कुटुंबीयांच्या स्वाधीन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** माणुसकी अजूनही जिवंत आहे याचा प्रत्यय आणून देणारी एक अत्यंत सुखद व डोळ्यात आनंदाश्रू आणणारी घटना दहेगाव रंगारी येथे घडली. सामाजिक कार्यकर्ते खुशाल इंगोले यांची सतर्कता आणि मनोरुग्णाचा रॉबिनहूड हितेश बनसोड यांच्यामूळे ५ महिन्यांपासून बेपत्ता असलेले ५६ वर्षीय शरद आनंदराव देशमुख अखेर आपल्या कुटुंबाला सुखरूप परत मिळालेत. सोशल मीडियावरील एका पोस्टने अवघ्या २१ मिनिटांत एका विखुरलेल्या कुटुंबाला पुन्हा एकत्र आणले.

नागपूरच्या हुडकेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या दिघोरी निलकमल नगर रोड येथील रहिवासी असलेले शरद आनंदराव देशमुख हे मागील ३० नोव्हेंबर २०२५ पासून अचानक बेपत्ता झाले होते. ५ महिन्यांपासून शरद देशमुख यांच्या कुटुंबियांनी शोध घेतला मात्र यादरम्यान शरद यांचा काहीच पत्ता लागला नाही.

२२ मे २०२६ रोजी दहेगाव रंगारी येथे एक अनोळखी व्यक्ती संशयास्पद अवस्थेत फिरताना आढळून आली. सदर व्यक्तीची अवस्था पाहून सामाजिक कार्यकर्ते व क्रिडा शिक्षक खुशाल इंगोले यांनी त्या व्यक्तीशी बोलण्याचा प्रयत्न केला. मात्र, मानसिक तणावामुळे त्या व्यक्तीला स्वतःची ओळख नीट सांगता येत नव्हती त्यामूळे हरवली व्यक्ती आहेत हे इंगोले यांच्या लक्षात आले.

इंगोले अधिक वेळ न घालवता सदर व्यक्तीचे छायाचित्र मनोरुग्णाचा रॉबिनहूड हितेश बनसोड यांच्याकडे पाठवले. हितेश बनसोड यांनी सोशल मीडियाच्या विविध ग्रुप्सवर एक हरवलेली व्यक्ती म्हणून पोस्ट केली. सोशल मीडियावर फोटो अपलोड होताच २१ मिनिटांत शरद देशमुख यांचा मोठा भाऊ गणेश देशमुख यांनी हितेश बनसोड यांच्याशी संपर्क साधला व माझा लहान भाऊ आहे असे सांगितले.




पाच महिन्यांपासून सुरू असलेला शोध व काळजाला पडलेली विरहाची जखम अवघ्या २१ मिनिटांत पुसली गेली.

घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हरीश रूमकर यांनी तात्काळ घटनास्थळ गाठून कायदेशीर कार्यवाही पूर्ण केल्यानंतर शरद देशमुख यांना त्यांचा मोठा भाऊ गणेश देशमुख व त्यांच्या नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. पाच महिन्यांनंतर आपल्या छोट्या भावाला समोर बघताच गणेश देशमुख व नातेवाईकांच्या अश्रूंचा बांध फुटला होता.यावेळी गणेश देशमुख यांनी शरद देशमुख मानसिक संतुलन बिघडते आहे, त्यांचे लग्न झाले नसून यापूर्वीही अनेकदा घर सोडून निघून गेले असल्याचे सांगितले.

मनोरुग्णाचा रॉबिनहूड हितेश बनसोड यांच्यासारखे तरुण समाजासमोर नवा आदर्श ठेवतात तेव्हा माणुसकी अजून जिवंत आहे आणि ती कोणत्याही संकटावर मात करू शकते हेच या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२२, राहुरी (अहिल्यानगर) :** शेती शाश्वत करण्यासाठी विद्यापीठाचे तंत्रज्ञान प्रभावी ठरणार असून यामध्ये कृषि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना मोठी संधी आहे. विद्यार्थ्यांमध्ये खुप मोठी क्षमता आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे गरजेचे होते. यासाठी विद्यापीठामध्ये स्पर्धात्मक परिक्षा, कृषि उद्योजकता व शेतीमधील उच्च तंत्रज्ञान या तीन फोरमची स्थापना करण्यात आली असून हे फोरम विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करण्यासाठी उपयुक्त ठरतील असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ.अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सन २०२५-२६ या वर्षाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थान वरून कुलगुरू डॉ.विलास खर्चे बोलत होते.




या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन पुणे येथील बोल्डनेट इंडिया करिअर सर्व्हीसेस या संस्थेचे संचालक इंजि. अविनाश देशमुख उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, काष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज संकुलाचे प्रमुख डॉ. महानंद माने व विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ.कैलास कांबळे उपस्थित होते. कुलगुरु डॉ.विलास खर्चे आपल्या मार्गदर्शनात पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. हा त्यांच्या आयुष्यामधील अभिमानाचा क्षण म्हणावा लागेल. विद्यापीठाने शेती संशोधनामध्ये फार मोठे तंत्रज्ञान विकसीत केले आहे. शेतकरी हे तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतात वापरत आहेत. या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठी संधी आहे कारण दुसरी हरितक्रांती ही कृषि अभियांत्रिकीचे विद्यार्थीच करतील असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. यावळी इंजि. अविनाश देशमुख विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की फक्त स्पर्धा परिक्षांवर अवलंबून न राहता आपली क्षमता ओळखुन काम करा. कृषि क्षेत्रातील शिक्षण न घेतलेले कृषि उद्योजक होत आहेत. तुम्ही तर या शेती क्षेत्रात शिक्षण घेत आहात. तुम्ही फक्त स्वतःवर विश्वास ठेवा, स्वतःला शोधा. तुमच्यातील कोणत्याही एका क्षमतेला विकसीत करण्यासाठी पाच वर्षांचा वेळ द्या. हे जग म्हणजे मोठे मार्केट असून यामध्ये खुप सार्या संधी आहेत. फक्त स्वतःला ओळखुन स्वतः करीता योग्य क्षेत्र निवडण्याची गरज असल्याचे यावेळी ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सचिन नलावडे यांनी केले. डॉ.अवधुत वाळुंज यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार डॉ.कैलास कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य उगले, संस्कृती सरोदे, साई मंडलीक व मधुरा लांडगे यांनी केले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध विभाग प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रत्नाई कृषिदूतांचे शिवामृत दूध संकलन केंद्रात कृषी औद्योगिक संलग्नता प्रशिक्षण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, माळशिरस (सोलापूर) :** शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ लि.चे अध्यक्ष धैर्यशील राजसिंह मोहिते पाटील तसेच व्यवस्थापकीय संचालक रवीराज शंकरराव इनामदार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या शिवामृत दूध संकलन केंद्रास कृषी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या गटाने नुकतीच शैक्षणिक भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी दूध संकलन प्रक्रिया, गुणवत्ता तपासणी, दूध प्रक्रिया विभाग तसेच आधुनिक डेअरी व्यवस्थापनाची प्रत्यक्ष पाहणी केली. विजयनगर – अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे कार्यरत असलेला शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ लिमिटेड हा १९७६ साली शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून सक्षम करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आला. सध्या संघामार्फत १८९ कार्यरत दूध सहकारी संस्थांच्या माध्यमातून सुमारे ४ हजार ७०० दूध उत्पादक सभासदांकडून दूध संकलन केले जाते. संघाकडे प्रतिदिन २ लाख लिटर क्षमतेचा अत्याधुनिक डेअरी प्रकल्प कार्यरत असून दूध प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थ निर्मितीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

ग्रामीण भागामध्ये स्वच्छ दूध उत्पादनासाठी १७ बल्क मिल्क कूलर्स व ४ चिलिंग सेंटर्स कार्यरत आहेत. शिवामृत डेअरीमध्ये स्टेरिलाइज्ड फ्लेवर्ड मिल्क, दही, पनीर, श्रीखंड, आम्रखंड, पेढा, खवा, बासुंदी, लस्सी, ताक, गुलाबजाम, स्पायसी छास यांसह काजू कतली, मिक्स बाईट, म्हैसूर पाक, बटर व तूप यांसारख्या विविध दुग्धजन्य पदार्थांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जाते. राष्ट्रीय बाजारपेठेतही शिवामृत उत्पादनांना मोठी मागणी आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना हमी बाजारपेठ, योग्य दर आणि तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देत ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे कार्य संघ सातत्याने करीत आहे.

दूध उत्पादकांना प्रशिक्षण, पशुवैद्यकीय सेवा, उच्च प्रतीचा पशुखाद्य पुरवठा तसेच जनावरांच्या आरोग्य व पोषणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर संघाचा विशेष भर आहे.विद्यार्थ्यांना डेअरी उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान, स्वच्छता व्यवस्थापन, दूध साठवण



प्रक्रिया तसेच विविध दुग्धजन्य पदार्थ निर्मितीविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

कृषी शिक्षणासोबत उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा. या उद्देशाने ही भेट आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षणासाठी शिक्षण प्रसारक मंडळ चे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य आर.जी.नलवडे, प्रा.एस.एम.एकतपुरे तसेच प्रा.एन.बी.गाढवे यांचे मार्गदर्शन लाभले. कृषीदूत मयुर रिसवडकर, सुरज महांगरे, हर्षद दुरगुडे, आर्यन पताळे, ऋषीकेश पाटील, पृथ्वीराज पाटील, प्रणव घुले, हर्षद काळे व यशवंत पटवारी यांनी शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ व्यवस्थापकांचे आभार मानले.

## कामोठे येथे अनधिकृत फेरीवाले व अतिक्रमणांवर विशेष कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, पनवेल :** महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' कामोठे अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार अतिक्रमण विभागाच्या वतीने नुकतीच विविध ठिकाणी अनधिकृत फेरीवाले, हातगाड्या तसेच जाहिरात टेम्पो यांच्यावर विशेष कारवाई करण्यात आली. कामोठे विभागातील मानसरोवर रोड, खांदेश्वर रेल्वे स्टेशन रोड, गणपती मंदिर परिसर, सेक्टर १८ नीलकंठ स्वीट परिसर, ॲक्सिस बँक समोरील परिसर, मोठा खांदा हायवे जवळील सेक्टर २२ तसेच कजरी समोरील फुटपाथ परिसरात ही कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रुपाली माने यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या कारवाईदरम्यान फुटपाथ व सार्वजनिक रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांच्या हातगाड्या, टेम्पो तसेच विविध साहित्य जप्त करण्यात आले.

नीलकंठ चौक येथून आईस्क्रीम व केएफसीची हातगाडी जप्त करण्यात आली. ही गाडी तसेच १ हातगाडी व १ अनधिकृत जाहिरात टेम्पो जप्त करून सुवर्णदुर्ग कार्यालय, कामोठे येथे जमा करण्यात आले. अतिक्रमण विभागाने केलेल्या कारवाईमध्ये एकूण १८ सिलेंडर, १८ हातगाड्या, १५ आईस्क्रीम गाड्या, १ जाहिरात टेम्पो, २ शिलाई मशीन, १७ खुर्च्या, ३ टेबल, १ वजन काटा, २ तवे, १ चायनीज काउंटर तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले.

# मान्सूनपूर्व तयारीला वेग; महापौर सय्यद इकबाल स्वतः उतरले मैदानात!

## परभणी शहरातील विविध भागांत नालेसफाई मोहिमेची जोरदार सुरुवात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, परभणी :** आगामी मन्सूनच्या पार्श्वभूमीवर परभणी शहर महानगरपालिकेकडून शहरातील पावसाळी व्यवस्थेची व्यापक तयारी सुरू करण्यात आली असून महापौर सय्यद इकबाल यांनी स्वतः पुढाकार घेत शहरातील विविध भागांत नालेसफाई मोहिमेला प्रत्यक्ष भेटी देत जोरदार सुरुवात केली आहे.

मागील काही वर्षांत पावसाळ्यात शहरातील अनेक भागांत पाणी साचणे, रस्ते जलमय होणे, नागरिकांच्या घरांमध्ये पाणी घुसणे तसेच दुर्गंधी व डासांच्या समस्यांमुळे नागरिकांना मठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. याच पार्श्वभूमीवर यंदा पावसाळ्यापूर्वीच प्रभावी उपाययोजना करण्याचा निर्धार महापालिका प्रशासनाने केला आहे.महापौर सय्यद इकबाल यांनी शहरातील प्रमुख नाले, गटारी, पाण्याचा निचरा होणारे मार्ग तसेच अतिसंवेदनशील भागांची पाहणी करत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीच्या सूचना दिल्या. शहरातील अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे साचलेला गाळ, प्लास्टिक कचरा, झाडाझुडपे आणि अडथळे हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. विशेष म्हणजे केवळ कार्यालयीन बैठका घेण्यापुरते मर्यादित न राहता महापौर स्वतः प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून कामांचा आढावा घेत असल्यामुळे प्रशासनातही चांगलीच हालचाल निमर्ण झाली आहे. शहरातील ज्या भागांत पावसाळ्यात सर्वाधिक पाणी तुंबते अशा परिसरांना प्राधान्य देण्यात आले आहे. नालेसफाईसाठी यंत्रसामग्री, जेसीबी, ट्रॅक्टर आणि सफाई कर्मचाऱ्यांच्या विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत यासाठी संबंधित विभागांवर देखरेख ठेवण्यात येत आहे.

महापौरांनी प्रत्येक प्रभागातील स्थानिक समस्या जाणून घेत नागरिकांशी संवादही साधला. यावेळी बोलताना महापौर सय्यद इकबाल यांनी सांगितले की, पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये ही आमची प्राथमिकता आहे. नालेसफाई, स्वच्छता, रस्त्यांची दुरुस्ती आणि पाणी निचऱ्याच्या सर्व कामांवर महापालिका प्रशासन विशेष लक्ष देत आहे. शहरातील प्रत्येक भागात नियोजनबद्ध कामे केली जातील आणि नागरिकांच्या तक्रारींना तत्काळ प्रतिसाद दिला जाईल.




महापौरांच्या या सक्रिय भूमिकेमुळे शहरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक नागरिकांनी महापौर स्वतः मैदानात उतरून कामांची पाहणी करत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. केवळ आदेश न देता प्रत्यक्ष उपस्थित राहून कामे करून घेणारे नेतृत्व शहरासाठी आवश्यक आहे, अशा प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केल्या.दरम्यान, आगामी काही दिवसांत शहरातील उर्वरित भागांतही नालेसफाई मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून स्वच्छता, आरोग्य आणि पावसाळी व्यवस्थापनावर विशेष भर दिला जाणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. शहराला पावसाळ्यापूर्वी स्वच्छ, सुरक्षित आणि जलतरणमुक्त ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाने कंबर कसल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

# अनधिकृत बांधकाम विरोधातील कारवाईत टिटवाळ्यातील तब्बल ५०० चाळी भुईसपाट

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२३, टिटवाळा (ठाणे) :** गेले काही दिवस कल्याण डोंबिवली पालिकेच्या मार्फत अनेक विभागात अनधिकृत बांधकाम विरोधातील मोहिमेत बेकायदेशीर बांधकामांवर बुलडोझर चालविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत टिटवाळ्यातील बेकायदा चाळी देखील जमीनदोस्त करण्यात आल्या.यावेळी बेकायदा चाळींचा बल्याण भागातील वतनदारी दाखविणारा पाठीराखा कारवाईच्या वेळी गायब होता.

कल्याण – कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील बेकायदा बांधकामांचे आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टिटवाळा, बल्याणी, मोहिली, खजुरी नगर भागात पालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण पथकाने शुक्रवारी सकाळी १० ते संध्याकाळी ६ या आठ तासाच्या कालावधीत भूमाफियांनी उभारलेल्या एकूण ४०० बेकायदा चाळी, १०० जोती तगड्या पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केल्या. तगडा पोलीस बंदोबस्त असल्याने भूमाफिया, या चाळींचे राजकीय आश्रयदाते कारवाईला विरोध करण्यासाठी पुढे आले नाहीत.

आयुक्त अभिनव गोयल यांनी टिटवाळा भागातील सर्व बेकायदा चाळी भुईसपाट करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त प्रसाद बोरकर यांना दिले होते. दोन दिवसापूर्वी या कारवाईची पालिका अधिकाऱ्यांनी गुप्तपणे आखणी केली होती. शुक्रवारी सकाळी १० वाजता अतिरिक्त आयुक्त गोडसे, उपायुक्त बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक आयुक्त सुषमा



मांडगे, साहाय्यक आयुक्त प्रसाद ठाकुर, साहाय्यक आयुक्त उमेश यमगर, साहाय्यक आयुक्त धनंजय थोरात, साहाय्यक आयुक्त जयराम शिंदे १०० हून अधिक तोडकाम कामगार, तेवढाच पोलीस बंदोबस्त, आठ जेसीबी घेऊन टिटवाळ्यातील धैर्यशीलनगर भागात पोहचले.

या ठिकाणाहून पथकाने बेकायदा चाळी तोडण्यास सुरूवात केली. कारवाई सुरू होताच नव्याने उभ्या राहिलेल्या बेकायदा चाळींमधील खोल्यांमध्ये तात्पुरता निवास करण्याची खेळी भूमाफियांनी केली. काही खोल्यांना कुलुपे तातडीने लावण्यात आली. पथकाने खोलीतील रहिवाशांना बाहेर काढले. कुलपे तोडून टाकली. या सर्व बेकायदा चाळी भुईसपाट केल्या. टिटवाळ्यातील बेकायदा बांधकामांचे पाठीराखे म्हणून शिक्का बसलेले अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त जयवंत चौधरी या मोहिमेत सहभागी होते. टिटवाळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ मुकेश ढगे यावेळी उपस्थित होते. डिसेंबर ते मार्च महिन्यात माफियांनी या बेकायदा चाळींची उभारणी केली होती.

दरम्यान टिटवाळा, बल्याणी, बनेली, वासुंद्री रस्ता, मोहिली भागात बेकायदा चाळी उभारणारे राजकीय पाठीराखे, त्यांचे पिट्टे या भागातून गायब झाले होते. गेल्या दहा दिवसापूर्वी बल्याणी भागात कारवाई करताना या राजकीय पाठीराख्यांनी कारवाईत अडथळा आणला होता. स्थानिक पोलीसही कायदा व सुव्यवस्थेचा येथे प्रश्न निर्माण होऊ शकतो असे प्रश्न करत पालिकेच्या कारवाईत अडथळा आणण्यासाठी सरसावले होते. यावेळी कोणत्याही परिस्थितीत टिटवाळ्यातील बेकायदा चाळी पूर्ण जमीनदोस्त करण्याचा निर्धार अधिकाऱ्यांनी केला होता.

या बेकायदा चाळी उभारताना अ प्रभागातील एका 'जेसीब'फेम माजी कामगाराने एका खोलीमागे माफियांकडून ३० हजार रूपये वसूल केले आहेत. 'जेसीबी'फेम हा कामगार आता अ प्रभागातून बदली झाला आहे. चाळी तुटत असताना माफिया या कामगाराला संपर्क करत होते, तो मोबाईल बंद करून बसला होता. या कामगाराने बेकायदा चाळींमधून कोट्यवधीचा दौलतजादा केल्याची चर्चा आहे.

शहरात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम सहन केले जाणार नाही. यामध्ये नागरिकांची आर्थिक फसवणूक आणि अशा बांधकामांमुळे जीवितास धोका निर्माण होतो. शहर नियोजनावर त्याचा विपरित परिणाम होतो. ही मोहीम यापुढेही सुरूच राहील असे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी सांगितले

तर बांधकामांच्या विरूध्दच्या अशा संयुक्त कारवाया यापुढे देखील पालिकेकडून नियमित राबविल्या जातील. संबंधितांनी अनधिकृत बांधकामे करू नयेत. अशी बांधकामे आढळली तर त्याची माहिती तात्काळ प्रशासनाला द्यावी असे आवाहन उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी केले आहे.

# सण-उत्सव शांततेत साजरे करु या ! जिल्हाधिकाऱ्यांचे नागरिकांना आवाहन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** पुढील आठवड्यात संपूर्ण जिल्ह्यात बकरी ईद साजरी करण्यात येणार आहे. या निमित्ताने जिल्हाभर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी चंद्रपूर जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. प्रशासनाला सहकार्य करुन नागरिकांनी सुध्दा सण आणि उत्सव आनंदात व शांततेत साजरे करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी केले.

नियोजन भवन येथे चंद्रपूर जिल्हा प्रशासन व पोलीस विभागाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शांतता समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश, सहायक पोलीस अधिक्षक गौरव कायंदे पाटील यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, शांतता समितीचे सदस्य, महिला दक्षता समितीचे सदस्य, पोलीस पाटील आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी पंत म्हणाल्या, शहरातील पाणी पुरवठा व वीज पुरवठा खंडीत होणार नाही, याची संबधित विभागाने दक्षता घ्यावी. सोशल मिडीयावर फेक किंवा निगेटीव्ह मॅसेज दिसला की त्वरीत पोलीस विभाग किंवा सायबर टीमला कळवावे. वेळेवर फॅक्ट चेक करावे, जेणेकरुन अफवा पसरणार नाही. विशेष म्हणजे पुढील काही दिवस चंद्रपूर जिल्ह्याला तीव्र उष्णतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे सकाळी सण साजरा झाल्यावर दुपारी कोणीही विनाकारण बाहेर पडू नये, असे आवाहन त्यांनी केले.

**पोलिस प्रशासन सज्ज – पोलिस अधिक्षक नोपाणी**

ईद निमित्त संपूर्ण जिल्ह्यात बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. गोमांसची तस्करी होऊ नये, यासाठी आंतरजिल्हा व आंतरराज्य सीमेवर नाकाबंदी पॉईंट्स सुरु करण्यात आले आहे. सोशल मिडीयावरील अफवांवर किंवा चुकीच्या पोस्टवर



लक्ष ठेवण्यासाठी सायबरची टीम २४ बाय ७ कार्यरत आहे. काही चुकीचे आढळल्यास पोलिस विभाग किंवा ११२ क्रमांकावर त्वरीत माहिती द्यावी. जिल्ह्यात बकरी ईद शांततेत साजरी करण्यासाठी पोलिस प्रशासन सजग आहे, अशी ग्वाही जिल्हा पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी यांवी दिली.

**नागरिकांनी केल्या सुचना :**

ईद निमित्त शांतता समितीच्या सदस्यांनी यावेळी प्रशासनाला सुचना केल्या. यात १) विद्युत पुरवठा अखंडीत राहावा २) पाणी पुरवठा नियमित व्हावा ३) कोणतीही अप्रिय घटना घडू नये, यासाठी चोख बंदोबस्त ठेवावा ४) गर्दीवर योग्यरित्या नियंत्रण असावे ५) असामाजिक तत्व व विघातक लोकांना गर्दीपासून दूर ठेवावे ६) सोशल मिडीयावर अफवा पसरु नये, यासाठी गांभीर्याने दक्षता घ्यावी ७) शहरातील पार्किंगचे योग्य व्यवस्थापन करावे ८) अवैध होल्डींग्जवर कारवाई करावी.

# थोडक्यात

## राजीव गांधी यांच्या स्मरणार्थ संविधानाच्या प्रस्तावनेचे वितरण आणि एसआयआर शिबिर

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२३, बल्लारपूर (चंद्रपूर) :** माजी पंतप्रधान आणि संगणक क्रांतीचे जनक, दिवंगत राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त, विद्यानगर येथील त्रिशरण बुद्ध विहारच्या प्रांगणात भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे वितरण आणि विशेष स्कर्टिंग बोर्ड पुनर्निरीक्षण (एसआयआर) शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी सकाळी सुरू झालेल्या या कार्यक्रमात नगराध्यक्षा डॉ. अलका वाढई, तहसीलदार रेणुका कोकाटे, मुख्य अधिकारी विशाल वाघ, नगर परिषद उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, शहर काँग्रेस अध्यक्ष अब्दुल करीम, नगरसेविका मोना धानोरकर, केंद्रीय बँड संचालक डॉ. अनिल वाढई, कैलाश धानोरकर, त्रिशरण बुद्ध विहारचे अध्यक्ष संदीप मेश्राम, महिला मंडळाच्या अध्यक्षा कविता जुमडे, माजी नगरसेवक गणेश कोकाटे आणि प्राध्यापक डॉ. विनय कवाडे यांचा समावेश होता.

या शिबिरात दादाभाई नौरोजी वार्ड व महाराणा प्रताप वॉर्डातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. मतदार यादीच्या विशेष, सखोल पुनरिक्षणासाठी दोन्ही प्रभागातील बीएलओ उपस्थित होते. शिबिर यशस्वीतेसाठी राजू मरमवार, समया जक्कू, संदेश दहेगावकर, शुभम दिवसे, गणेश चौहान, अशोक दंडलवार, जयराज ढेकळे, रशीद शेख, धर्मा महाकाली, राकेश शिवणकर, मुकेश दंडू, आदींनी सहकार्य केले.

## आयुक्त डॉ.शिंदे यांनी सायकलवर अधिकाऱ्यांसमवेत केला नवी मुंबई पाहणी दौरा

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.२३, नवी मुंबई :** पंतप्रधान महोदयांनी पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर देशवासियांना केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने व त्यानुसार महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सकाळी ६ पासून ९ वाजेपर्यंत बेलापूर व नेरूळ विभागात अधिकाऱ्यांसमवेत सायकल चालवत पाहणी दौरा केला. याप्रसंगी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या समवेत शहर अभियंता शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त प्रशांत नेरकर या अधिकाऱ्यांनीही सायकल चालवत पाहणी दौऱ्यात सहभाग घेतला. नेरूळ सेक्टर १ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून पाहणीला सुरूवात करीत शिरवणे, सारसोळे, कुकशेत, करावे, ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसर, सीवूड रेल्वेवरील उड्डाणपूल, पारसिक हिल, इन्कम टॅक्स कॉलनी, आग्रोळी येथील जलउदंचन केंद्र अशा विविध भागातील स्वच्छता, शौचालये, उद्याने, मार्केट, सायकल ट्रॅक, पम्प हाऊस अशा विविध बाबींची त्यांनी सायकलवर पाहणी करीत आवश्यक त्या ठिकाणी थांबत संबंधित अधिकाऱ्यांना सुधारणांविषयक मौलिक सूचना केल्या. विशेषत्वाने शिरवणे, सारसोळे, कुकशेत, करावे अशा गावांच्या परिसराची पाहणी करताना तेथील स्वच्छतेमध्ये अधिक सुधारणा करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. गावठाणांच्या बाजूला असलेल्या सेक्टर भागातही स्वच्छतेवर अधिक भर देण्याच्या सूचना करण्यात आल्या. शिरवणे जुईनगरच्या चिंचोली उद्यानाची सुधारणा करावी असे निर्देशित करतानाच तेथील शौचालय सुस्थितीत असून त्याप्रमाणे इतर शौचालयांची स्थिती ठेवावी असे त्यांनी सूचित केले. विशेषत्वाने पाम बीच रोडवर वझिराणी स्पोर्ट्सच्या कॉर्नरला पुढे असलेले शौचालय काहीसे पाठीमागे सरकवावे असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले. सारसोळे येथील आरोग्यवर्धिनी केंद्राच्या आसपासच्या परिसराची स्वच्छता करून घ्यावी तसेच त्याठिकाणचे मार्केटचे काम लवकरात लवकर करून ते उपयोगात आणावे असेही निर्देश आयुक्तांनी दिले. करावे गावाच्या कॉर्नरलाही नागरिकांची गरज लक्षात घेऊन मार्केट बनविण्याचे त्यांनी सूचित केले.

## राज्यातील शाळा उशिरा सुरु होणार?

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२३, नागपूर :** विदर्भात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, राज्य सरकार शाळा सुरू होण्याची तारीख पुढे ढकलण्याचा गंभीरपणे विचार करत असल्याचे माहिती राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिले आहेत. नागपुरात माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. विदर्भात सध्या उष्णतेची भीषण लाट सुरू असून अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४५ अंशांच्या पुढे गेले आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस विदर्भात उष्णतेचा तडाखा कायम राहण्याचा इशारा दिला आहे. अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट, तर नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री भोयर म्हणाले की, दिवसेंदिवस तापमान हे वाढतच आहे. त्यामुळे जर येणाऱ्या १५ जूनपर्यंत ही दाहकता अशीच राहिली आणि तापमान असंच राहिला तर विद्यार्थ्यांचा सुरक्षेच्या दृष्टिकोनातून १५ जून शाळा सुरू करण्याची तारीख आहे, ती पुढे ढकलण्याचा विचार करण्यात येईल असेही ते म्हणाले. यासंदर्भात एक याचिकाही दाखल करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली. शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण व्हावा, या दृष्टीने १५ जूनपासून शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, सध्याची उष्णतेची परिस्थिती कायम राहिली तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा सुरू होण्याची तारीख वाढवण्याचा निर्णय घेतला जाईल. हा प्रस्ताव सध्या विचाराधीन असून याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे भोयर यांनी सांगितले.

दरम्यान, वाढत्या तापमानाचा परिणाम विद्यापीठाच्या परीक्षांवर होत आहे, नागपूर विद्यापीठाच्या परीक्षा सुद्धा दुपारच्या आणि उन्हाच्या परिस्थितीत होत आहे. यावर ते म्हणाले की, विद्यापीठाच्या सगळ्या परीक्षा या सकाळचा सत्रात घेण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षा केंद्रांची संख्या वाढविण्यात येणार असल्याचे भोयर यांनी सांगितले.